# ॥ अध्याय बारावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ ॥ गुरुरायास शिष्य विनवी । श्रीगुरुलीलामृतचवी । वारंवार ग्रहण करावी । तृप्ति व्हावी यथार्थ ॥ १ ॥ जैसी पुनः पुनः लागे क्षुधा । अन्नादि-भक्षणें जाय बाधा । गुरुलीला प्रबोध-सुधा । प्राशन करवा मजलागीं ॥ २ ॥ श्रवणद्वारें प्रचुरपान । व्हावया झालें उदित मन । कृपा करूनियां कथन । करा पावन निजदासा ॥ ३ ॥ तंव श्रोते वदती वियोग । अवधूतलीला राजयोग। न साहवे क्षणेक वेग । कथा-प्रसंग वदा जी ॥ ४ ॥ पतिव्रतेसी वियोग पतीचा । असह्य होय निमिषाचा । श्रोत्रियब्रह्मनिष्ठ सद्गुरूचा । सच्छिष्यासी तद्वत् ॥ ५ ॥ श्रवणासि आलिया अंतराय । नुमजती सच्छास्त्राभिप्राय । कथामृतपानासी अवश्य । चित्त संलग्न पाहिजे ॥ ६ ॥ श्रवणसमयीं वृथा कुतर्क । नसावा अन्यकामसंपर्क । रहस्य कळावया सुतर्क । मर्यादाविहित करावे ॥ ७ ॥ तस्मात् कुतर्क परित्यागुनी । श्रुत्याश्रय करावा मुमुक्षुजनीं । शमदमादिचतुष्टयसाधनीं । युक्त मुमुक्षु पाहिजे ॥ ८ ॥ गुर्वाज्ञासेवातत्पर । शिष्य असावा सुमति चतुर । निष्काम शुद्धमानस निरंतर । श्रवणातुर सुशील ॥ ९ ॥ ऐकूनि श्रोतियांचें वचन । वक्ता बोले प्रसन्नवदन । तुम्ही जाणतां ज्ञानविज्ञान । श्रोते शुद्ध मानसें ॥ १० ॥ वक्त्याचा न्यूनाधिकदोष प्रसंगीं । श्रोतेच जाणती सत्संगी । अध्यात्मविद्या श्रोतियांचे अंगीं । सशास्त्र सदा वसतसे ॥ ११ ॥ श्रोतियांचें होतां अनवधान । कथाभाग होई रसहीन । भक्तिज्ञानवैराग्यसंपन्न । श्रुत्यर्थरसज्ञ श्रोते हो ॥ १२ ॥ श्रोते तुम्ही परमचतुर । क्षमाशांतिदयागुणयुक्त गंभीर । परब्रह्मपरंधाम परात्पर । अर्थज्ञलक्षणप्रमुख ते ॥ १३ ॥ ज्याकरितां विहितकर्मधर्म । समाधि-

योग प्राणायाम । अपरिमित साधनें निष्काम । जन्मोजन्म आचरती ॥ १४ ॥ सर्वांतर्यामी जयाचा निवास । ओतप्रोत ज्योतिराभास । ज्याची वेद पुराणें इतिहास । कीर्ति गाती अखंड ॥ १५ ॥ दीन हीन पंगु अंध दुर्बळ । दरिद्री रोगी दुःखी सकळ । विश्वकुटुंबवत्सल दयाळ । संरक्षणार्थ संचरे ॥ १६ ॥ स्वच्छंदें व्यवहारी स्वतंत्र । जो सर्वकाल भक्तपरतंत्र । संपूर्णविश्वप्रकाशक मित्र । लीला विचित्र जयाची ॥ १७ ॥ यतिपति असूनि विश्वकुटुंबी । काषाय वस्त्र करीं दंड तुंबी । निर्लेप विभासक निरालंबी । नरवेषधारी हिंडतसे ॥ १८ ॥ दृढ वैराग्य असूनि सर्वभूतीं । ज्याची सदोदित प्रीति । भिक्षुक असून जगदीश श्रीमंती । असे अगम्य चरित्र जयाचें ॥ १९ ॥ ज्यानें धर्मराजाच्या मखांत । उच्छिष्टपत्रावळी काढिल्या अमित । अर्जुनरथींचा सारथी होत । अश्व धूत पार्थाचे ॥ २० ॥ स्तंभीं प्रगटला प्रऱ्हादास्तव । तोचि नृसिंहेश्वर वास्तव । ऋषि योगी सकल करिती स्तव । अवतरला कलियुगीं तोचि ॥ २१ ॥ प्रसिद्ध काठेवाडप्रांतीं । सौराष्ट्रदेशीं गिरनारपर्वतीं । जुनागढ जयासी म्हणती । यात्रेसि जाती सकळिक ॥ २२ ॥ गिरनारपर्वत विराजमान् । श्रीमद्दत्तात्रेय सनातन । त्या प्रभुचें प्रियवसतिस्थान । असे प्रख्यात श्रोते हो ॥ २३ ॥ जेथें मुनि योगि व्रती तपी । भक्त विरागी अनुष्ठानी जपी । रोगी दुःखी त्रिविधतापी । स्वस्वकार्यार्थी वसती ते ॥ २४ ॥ ब्रह्मचारी संन्यासी गृहस्थ । साधु संत महंत वानप्रस्थ । व्हावयासी पूर्ण मनोरथ । येती समस्त रावरंक ॥ २५ ॥ अलखनिरंजनगुरु गिरिनारीं । श्रीदत्तावधूतध्वजाधारी । त्रैलोक्यासी भरंवसा भारी । ऐसें वदती सकल सदा ॥ २६ ॥ अशा प्रसिद्ध गिरनारपर्वतीं । श्रीमन्नृसिंह विश्वपति । गौमुखतीर्थीं येऊनि वसती । सर्वभूतहितास्तव ॥ २७ ॥ आपलें पूर्वींचें प्रिय स्थान । पूर्णब्रह्म श्रीगुरु अत्रिनंदन । परमहंसरूप धारण करून । अवलोकनार्थ पातले ॥ २८ ॥ अमानुषिक अवतार कृत्य । जगदुद्धरणार्थ ज्याचें स्तुत्य । 'अहमात्मा' स्वरूप उपलब्ध नित्य । तो गिरिनारीं हिंडतसे

॥ २९ ॥ गौमुख तीर्थाहून मार्गें पादचारी । शेषनारायण पादुका मध्यंतरीं । आम्रवृक्ष शोभा साजिरी । असती लतासमूह ॥ ३० ॥ पुढें तीर्थ हनुमानधारी । हनुमानमुखें वाहतसे वारी । हनुमंत मूर्ति दुजी सामोरी । सुंदर ध्यान स्वरूप असे ॥ ३१ ॥ या हनुमानधारी स्थानांत । वसती विरागी साधुमहंत । दर्शनासी येती जन बहुत । पाहूनि हनुमंता आनंदती ॥ ३२ ॥ पादचारी अति लहान वाट । सभोंवतीं वृक्षलता घनदाट । जिकडे तिकडे सुगंध अवीट । आनंदप्रद भरलासे ॥ ३३ ॥ त्या हनुमानधारी स्थानीं । योगीश्वर श्रीनृसिंहमुनि । वसते झाले द्वय रजनी । भक्तजनांच्या आग्रहें ॥ ३४ ॥; त्यांत एक विरागी पांगळा । त्यानें योगीश्वर देखिले डोळां । नमन करावया उतावळा । झाला परी हालवेना ॥ ३५ ॥ हात जोडूनि म्हणे बावा । चरणीं ठाव प्राप्त व्हावा । असा हेतु सोत्कंठ बरवा । माझ्या मानसीं उपजला ॥ ३६ ॥ काय करूं आतां उपाय । न हालती न चालती पाय । दीनदुर्बळ झाला निरुपाय । प्रारब्धहीन मी असें ॥ ३७ ॥ मोठमोठ्यानें मारीत हाका । अहो अनंतब्रह्मांडनायका । गुरुगिरिनारी उभे ठाका । चरणपादुका वंदीन ॥ ३८ ॥ मी पंगु अनाथ पराधीन । आपण परमेश्वर दीनदयाघन । अप्राप्त झालें उदकान्न । तैसेंचि दर्शन मजलागीं ॥ ३९ ॥ दिसतां आपण नरवेषधारी । अज्ञानें नोळखिती नरनारी । परी साक्षाद्दत्तात्रेय हरि । गिरिनारीं मज भासतसां ॥ ४० ॥ दीनवाणी श्रवण करून । द्रवले महादेव त्रिलोचन । पंगूसि बोलती मधुरवचन । आक्रोश रुदन करिशी कां ॥ ४१ ॥ चक्षु झांकोनि इकडे यावें । त्वां मार्गे पुढें न अवलोकावें । निर्भय धैर्यें त्वरित उठावें । संशय किमपि धरूं नये ॥ ४२ ॥ तेथें असलेले साधु कित्येक । तैसेचि जमलेले यात्रस्थ लोक । म्हणती उपजत पंगु हा मूर्ख । ऐकतो काय जोगड्याचें ॥ ४३ ॥ गर्भस्थपंगु कोणी चालतां । न देखिला, ऐकिली न वार्ता । सिद्धि-साक्षात्कार बोलण्यापुरता । सत्य न होय कदाकाळीं ॥ ४४ ॥ असे ईश्वररूप म्हणून । भूमंडळीं फिरती रात्रंदिन । या कलियुगांत साधु संत जन ।

अवतारिक कशाचे ॥ ४५ ॥ साधुविरागी उदरभरणार्थीं । कोठें कोणी नसती परमार्थी । आम्हांस संशय नसे यदर्थीं । ऐसें बोलती निष्ठुर ते ॥ ४६ ॥ अंगासी लावूनियां राख । जटा वाढवूनि रंगितमुख । टिळे माळा वाजविती शंख । आपणांसी साधु म्हणविती ॥ ४७ ॥ जटिल मुंडी लुंचित केश । काषायांबर कृतपरिवेष । मठ महंती काम राग आवेश । उदरनिमित्त वेष बहु करिती ॥ ४८ ॥ ते हिंडती जरी चारी धाम । अथवा वसविती संस्थान ग्राम । संपादिती बहु वित्त हेम । घृत पक्वान्नादिक भक्षिती ॥ ४९ ॥ नग्न अथवा कौपिनवस्त्र । अज्ञातयोग वेदांतसार शास्त्र । द्वेषी निंदक वाग्बाणास्त्र । अशस्त्र वध करिती ते ॥ ५० ॥ ते कैंचे साधु विरागी भक्तजन । सत्यभक्ति-वैराग्य-विहीन । नसे जयांसी ब्रह्मात्मज्ञान । कर्मानुष्ठानशून्य ते ॥ ५१ ॥ ऐशा क्षेत्रस्थ पाषाणहृदया । कैंची ज्ञात सर्वभूतदया । द्रव्यावांचूनि अन्य क्रिया । न जाणती साधु हे ॥ ५२ ॥ असो त्या दीनपंगूस पाचारिती । जगदात्मा गुरु नृसिंहयति । शिरसां आज्ञा मानूनि निश्चितीं । चित्तीं हर्षित जाहला ॥ ५३ ॥ पंगु बोले आतां कांहीं होवो । मम देह राहो अथवा जावो । तो भगवंत मजला पावो । दृढनिश्चयात्मक दयाळु ॥ ५४ ॥ मग पंगूनें नेत्र झांकिले । श्रीमत्परमहंस मनीं चिंतिले । म्हणे देवाधिदेवा मज सांभाळिलें । पाहिजे आपण समर्थांनीं ॥ ५५ ॥ ऐसें वदूनि पंगु झडकरी । उठून चालला पादचारी । देखती समस्त साधुब्रह्मचारी । म्हणती काय आश्चर्य हें ॥ ५६ ॥ समर्थांचिया चरणांजवळ । ठेवितां सद्भाव न लागतां वेळ । गर्भस्थपंगु सवेगें तात्काळ । चालत गेला साहजिक ॥ ५७ ॥ मग पंगु नृसिंहचरणारविंदां । सच्चित्सुखात्मकआनंदकंदा । दीनभक्तजनवत्सल मुकुंदा । परमानंदा वंदितसे ॥ ५८ ॥ म्हणे जयजय हो गुरुगिरिनारी । श्रीमद्दत्तात्रेयध्वजाधारी । विश्वेश्वरा भरंवसा भारी । आहे चराचरीं आपुला ॥ ५९ ॥ मूकासि करितसां वाचाल । पंगु-अंधादिकांचे तात वत्सल । पंगु लंघिती गिरि अखिल । रमाधवा युष्मत्कृपें ॥ ६० ॥ मी गर्भस्थ

पंगु चढलों गिरि । न लागतां विलंब क्षणभरी । सहजदर्शनें कृपें नरहरि । पूर्णावतारी गुरुवर्या ॥ ६१ ॥ अतुलसामर्थ्य कलियुगांत । मीं अनुभविलें निमिषांत । आपण प्रत्यक्ष परमेश्वर अच्युत । निःसंशय आहां कीं ॥ ६२ ॥ वारंवार नृसिंहचरणावरी । मस्तक ठेवून दंडवत करी । म्हणे बहुत जन्मांचें श्रीनरहरि । सार्थक झालें दर्शनें ॥ ६३ ॥ पंगुअंधादिकांचा वृथैव । दुःखरूप जन्म सर्वथैव । जीवंत असूनियां शव- । समान लोकां दिसती ॥ ६४ ॥ आधीं गिरिनारी स्थान विशेष । त्यांत भेटले महापुरुष । दर्शनें गेले दुरितदोष । पंगु चालूं लागलों ॥ ६५ ॥ जन्मपंगु चढला गिरिवर । हा अत्यद्भुत चमत्कार । पाहूनि भयभीत झाले समग्र । म्हणती ईश्वर हाचि आहे ॥ ६६ ॥ मुखावरी ताडिती स्वकरें । निंदक निर्लज्ज आपटिती शिरें । आम्ही साधु न, दुर्जन खरे । लांडे पशु जन्मलों ॥ ६७ ॥ पाहूनि घेतला पायांवरी धोंडा । आग लागो आमच्या तोंडा । रोविला अपकीर्तीचा झेंडा । बांधिला गंडा कंठीं तो ॥ ६८ ॥ निर्लज्ज चाभरी चावट जिव्हा । मांसाचा लहान तुकडा अहाहा । दुःखसमुद्रीं बुडवितो महा । असह्य बोल बोलुनी ॥ ६९ ॥ काय उपयोगी ऐशी जीभ । दुःखफळ देणारी अशुभ । छेदूनि टाकावी म्हणूनि प्रारंभ । केला शस्त्र घेऊनि ॥ ७० ॥ निंदकांची सानुताप मति । पाहून नृसिंहसरस्वती । तयां निंदकांसी निषेधिती । रसनाछेदें दुःख असे ॥ ७१ ॥ वृथा प्राणिमात्रांचा मानभंग । करूंचि नये अतिप्रसंग । तीव्रवैराग्यें महापुरुषसंग । विवेकप्राप्त्यर्थ करावा ॥ ७२ ॥ प्रपंचसंगचि होतसे बाधक । निःसंग अत्यंत सुखदायक । दृढभक्ति वैराग्य सविवेक । ऐसा सत्संग घडावा ॥ ७३ ॥ सत्संगत्वेंचि निःसंगत्व । निःसंगत्वें होय निर्मोहत्व । निर्मोहत्वें निश्चिततत्त्व । जीवन्मुक्त होय सत्य पैं ॥ ७४ ॥ सारासार सद्विचार सत्संगति । तथा दृढतर प्रेम गुरुभक्ति । येणेंचि होय परमपदप्राप्ति- श्रुतिशास्त्रें कथिती यदर्थ ॥ ७५ ॥ तस्मात्सर्वप्रयत्नेंकरून । खरा साधुसमागम चिरंतन । श्रोत्रिय-ब्रह्मनिष्ठ-आचार्यवान् ।

तो गुरुकुलवास घडावा ॥ ७६ ॥ ऐशा गुरुकुलवासावीण । अप्राप्त परमपद निर्वाण । श्रीगुरुमुखें परमामृत श्रवण-। द्वारें प्राशन करिती ते ॥ ७७ ॥ परमपुरुषाचा समागम । अनायासें लाधला निष्काम । तयांचे हृदयस्थ स्वात्माराम । परंधाम प्रगटला ॥ ७८ ॥ परमपुरुषाचे बहुत आभार । मानूनि करिती नमस्कार । म्हणती जयजय दत्तदिगंबर । विधि-हरिहर भेटले ॥ ७९ ॥ पूजनादिक झालियानंतर । सांगूनि तीर्थमाहात्म्य सुंदर । निघाले गिरिनारीयोगविद्वर । ज्यांचें अपार चरित तें ॥ ८० ॥ जन्मपंगु चढला श्रीगिरि । त्याचें नाम गणेशपुरी । चंचलभारती आनंदगिरि । श्रीगुरुसंगें निघाले ॥ ८१ ॥ तैसेचि कृष्णानंदसरस्वती । रामपर्वत विश्वचैतन्ययति । हर्षभरित निघाले सोबती । नृसिंहस्वामीसमागमें ॥ ८२ ॥ अशाप्रकारें शिष्यांसहित । नृसिंहस्वामी दत्तावधूत । शेषनारायणपादुका पाहत । परमानंदें चालती ॥ ८३ ॥ रामानंदाच्या पादुकांसंनिध । आले नाशक तापत्रिविध । तें श्रीनृसिंहचरित्र अगाध । ऐका शुद्धमानसें ॥ ८४ ॥ रामानंदसत्पुरुषाच्या । चरणपादुका असती साच्या । गौमुख आणि हनुमानधारी मारुतीच्या । बाजूस सुंदर शोभती ॥ ८५ ॥ तेथें वसती आसपास । साधुसंत भक्त हरिदास । श्रीगिरिनारीगुरुदर्शनास । जाती येती नियमें ते ॥ ८६ ॥ तेथें उदकांचे लहान झरे । पर्जन्योदकें टांकी भरे । अत्युष्ण कालांत उदक नुरे । तेव्हां त्रास होतसे ॥ ८७ ॥ कमंडलु तीर्थीं आणि गौमुखांत । त्याप्रकारेंच हनुमानधारींत । कामापुरतें उष्णकालांत । निर्मल उदक राहतसे ॥ ८८ ॥ कमंडलु तीर्थीं नित्य स्नान । कमंडलुवरती अखंडासन । गुरुगिरिनारीचें भस्म विलेपन । मुख्यत्वेंकरून होतसे ॥ ८९ ॥ कमंडलूपासून अत्युच्च शिखर । आकाशीं शोभायमान सुंदर । प्रमुख अनादि मनोहर । दत्तात्रेय स्थान विराजे ॥ ९० ॥ गुरुगिरिनारी दत्तदिगंबर । उच्च शिखरीं ते जगदीश्वर । स्वच्छंदें वसती निरंतर । परंतु न दिसती कवणासी ॥ ९१ ॥ श्रीदत्तात्रेय-चरणपादुका । उच्च शिखरीं आनंददायिका । अध्यात्मज्ञान प्रकाशिका ।

बहुत प्राचीन असती त्या ।। ९२ ।। पादुकांजवळी सिद्धिविनायक । वसतसे सर्वविघ्नांतक । गिरिनारीचीं स्तोत्रें अनेक । करी गायन गणपति ।। ९३ ।। तैसाचि वातात्मज हनुमंत । कर जोडूनि उभा तिष्ठत । श्रीदत्तगुणानुवाद सदोदित । अतिप्रेमें वर्णितसे ।। ९४ ।। पाठीमागें श्रीशंकराचार्य । वेदविहित धर्मकर्मप्रवर्तकवर्य । शंकर साक्षात्कर्ते जगत्कार्य । स्वतःसिद्ध वसती ते ।। ९५ ।। वेदसागरांतून ज्यांनीं । उपनिषदार्थामृत मथूनि । वेदान्त विज्ञान उद्धृत करूनि । उपकार केले जगतावरी ।। ९६ ।। हे साक्षात्पूर्ण श्रीशंकर । वेदांतांभोज उदयभास्कर । व्याससूत्राचे भाष्यकार । स्वामी शंकर जगद्गुरु ।। ९७ ।। उपनिषद-शारीर-भगवद्गीता । हें प्रस्थानत्रय मुख्यता । ह्या प्रस्थानत्रयावरी भाष्य तत्त्वतां । केलें विस्तृत शंकरें ।। ९८ ।। तीर्थ क्षेत्र अनेक देवस्थानें जाण । जागृत केलें धर्मसंस्थापन । वेदविहित मार्गासी लाविले जन । दयाळु शंकर स्वामींनीं ।। ९९ ।। वेदांत अद्वैत परमामृत । लोपलें होतें कलियुगांत । जें अनादि वेदशास्त्रसंमत । केलें संस्थापन ज्यांनीं तें ।। १०० ।। असंख्य देवताष्टकें स्तोत्रें । सुसरल रचिलीं परम पवित्रें । अर्थगांभीर्य मधुर देवादि चरित्रें । सुबोधार्थ प्रकाशिलीं ।। १ ।। जीं पठतां श्रवण करितां । समाधान उल्हास वाटे चित्ता । सरल सोपी सुरस कविता । सर्वत्र जनांसी मान्य जे ।। २ ।। ते शंकराचार्य गिरिनार पर्वतीं । श्रीगुरुदत्तात्रेयासी आराधिती । दत्तप्रसादें विजय विख्याति । स्वल्प वयांत लाधले ।। ३ ।। श्रीदत्तात्रेयचरणांसंनिध । शंकराचार्य नाम प्रसिद्ध । बैसले असती नित्यप्रबोध । जगद्धितार्थ आनंदें ।। ४ ।। विनायकाच्या सन्निकर्ष । घंटा शोभतसे सर्वोत्कृष्ट । घंटारव ऐकतां संतोष । वाटे प्रिय जनांला ।। ५ ।। गुरुगिरिनारीचें शिखर । अत्युच्च पांचवें दिसे सुंदर । दुरूनि भासे महा भयंकर । चढतां श्रम वाटती ।। ६ ।। परंतु अद्यापपर्यंत । गुरुगिरिनार पर्वतांत । चढतां उतरतां दुःखित मृत । कोणीही झालें नसेचि ।। ७ ।। मुख्य शृंगावरती जाऊन । श्रीगिरिनारीचें घेतां चरणदर्शन । श्रमपरिहार वाटे समाधान । प्रसन्न मन

होतसे ॥ ८ ॥ धर्मवृक्षाचें बीज गहन । कविवर ऋषि योगी सज्जन । भक्तादि अखिल जनांचें जीवन । दत्तात्रेय नाम असे हो ॥ ९ ॥ सर्वांसि विश्रांतिस्थान प्रमुख । दत्तात्रेय गिरिनारीचे सुरेख । गिरनारमाहात्म्यग्रंथीं लेख । सुरस जाण वर्णिला ॥ ११० ॥ असो श्रीमन्नृसिंह मुनीश्वर । शिष्यांसहित गंगाधर । निजस्थान श्रीगिरिनार । अवलोकिती मंदगति ॥ ११ ॥ गोमुखतीर्थाहूनि अंबिका- । स्थानीं आले क्षणें एका । समर्थासि देखूनि जगदंबिका । हास्यवदनें बोलतसे ॥ १२ ॥ सोडूनि निजस्थान आपुलें । स्वामी आपण कोठें होतां गेले । बहुत दिवसां सगुणब्रह्म देखिलें । श्रीमत्परमहंस स्वरूपी ॥ १३ ॥ समर्थ वदती अहो माते । आम्ही संचरतों तीर्थक्षेत्रातें । आलों श्रीच्या दर्शनातें । देवस्थानें विलोकित ॥ १४ ॥ ऐक्यरूपें अभेदें उभयतां । कार्यकारणरहित तत्त्वतां । भाषणें गंभीर जगद्धिता- । कारणें करिती परस्पर ॥ १५ ॥ प्रकृतिपुरुषाचा नसेचि भेद । ऐसें वर्णिती शास्त्रें वेद । लोककल्याणास्तव संवाद । वेगळेपणें नव्हे तो ॥ १६ ॥ येथें उपमान उपमेय । त्याप्रकारें न हेयोपादेय । तैसेचि व्यतिरेक अन्वय । ब्रह्माद्वितीय स्वरूपीं नसे ॥ १७ ॥ यथा दीप आणि प्रभा एक । करितां नयेचि व्यतिरेक । तथा पुरुष शिवशक्त्यात्मक । विश्वव्यापक चैतन्य हो ॥ १८ ॥ सूर्य आणि प्रकाश जेवीं । गूळ आणि गोडी बरवी । उदकीं मधुरता ऐक्य जाणावी । प्रकृति पुरुष तद्वत् ॥ १९ ॥ अभेद ऐक्य शिवशक्तिसंवाद । सहजस्थितीचा अनुवाद । केवळ स्वात्मानुभव सर्वार्थप्रद । निरपवाद श्रेयस्कर ॥ १२० ॥ अंबाजीचें करूनि दर्शन । गोरक्षनाथासि सगळे भेटून । अवघडनाथासी विलोकून । कमंडलुतीर्थी पातले ॥ २१ ॥ देवतामय गिरनारपर्वत । योगी भोगी साधु विरक्त । पशु पक्ष्यादिक जन समस्त । युक्त मनोहर विराजे ॥ २२ ॥ वनौषधि आणि सुवासिक लता । नानावृक्ष शोभविती पर्वता । जिकडे तिकडे सुगंध तत्त्वतां । आनंदप्रद भरलासे ॥ २३ ॥ पर्वतांतून स्वच्छोदकाचे झरे । कमंडलु तीर्थांत पाझरती गोजिरे । अत्यंत शुद्ध जळ साजिरें । मधुर

शीतल निरोगी ॥ २४ ॥ ऐशा पवित्र तीर्थाचें दर्शन । आणि तीर्थोदक स्नान । घडतां तीर्थोदक प्राशन । होई पावन जगत् सर्व ॥ २५ ॥ कमंडलुतीर्थाचें महिमान । अपार अतर्क्य असे गहन । ज्यांत प्रत्यक्ष अत्रिनंदन । करिती स्नान दत्तगुरु ॥ २६ ॥ श्रीमद्गुरु नृसिंहसरस्वती । सकलांसह स्नान करिती । संध्यावंदनादि कर्म आचरती । पूजिती तीर्थ-देवता ॥ २७ ॥ तेव्हां सर्वत्र आनंदमय । मुखें वदती गिरिनारी दत्तात्रेय । रामदास सेवादास आणि कृष्णदास त्रय । साधु तीर्थस्नाना पातले ॥ २८ ॥ तंव वदे कृष्णदास । जयजय गिरिनारी जगन्निवास । दर्शन द्यावें निज दासास । या प्रसंगीं योगिराजा ॥ २९ ॥ तंव रामदास साधु बोले । आपण साधु कलियुगांतले । श्रीदत्तदर्शन दुरावलें । भले भले थकले हो ॥ १३० ॥ मग वदे सेवादास विरागी । पूर्णानुभवी हठयोगी राजयोगी । कोणी न दिसती या कलियुगीं । गुरु-गिरिनारीवांचूनि ॥ ३१ ॥ तीर्थ-क्षेत्र-देवतास्थान । कलीमध्यें असें स्थानपूजन । प्रत्यक्षप्रमाण देवता-दर्शन । न होय जाणा निश्चयें ॥ ३२ ॥ हें ऐकूनि चंचलभारती । वदतसे साधुवृंदाप्रति । चित्तशुद्धिविना देवताप्रतीति । कैशी होय दर्शनेच्छूसी ॥ ३३ ॥ अंतःकरण झालिया पवित्र । महत्पुरुष गुरुकृपें देवचरित्र । साक्षात्कार होय प्रत्यक्ष विचित्र । निःसंशय निश्चयें ॥ ३४ ॥ मनीं नसतां विशुद्ध भाव । कैंचा पावे देवाधिदेव । निष्काम कर्मोपासनें अवश्यमेव । चित्त शुद्ध होतसे ॥ ३५ ॥ परमेश्वर-सद्गुरुसेवन । करितां होय निर्मल मन । मग साक्षात्कार देवदर्शन । सत्य सत्य होतसे ॥ ३६ ॥ वेदविहित सत्पथ जरी सांपडे । महापुरुष-समागम जरी घडे । शुद्धहृदयीं तरीच रोकडें । उघडें दिसे परब्रह्म ॥ ३७ ॥ श्रीगुरु-हरिभक्ति प्रेमळ । सेवाआज्ञातत्पर त्रिकाळ । प्रत्यक्ष दर्शन लाभे तात्काळ । शुद्ध सात्त्विक शिष्यासी ॥ ३८ ॥ श्रीमन्नृसिंह गुरुराय । येथें बैसले गिरिनारी दत्तात्रेय । अवलोकूनि धरा पाय । पावन व्हाल यत्कृपें ॥ ३९ ॥ सोडा सोडा हो संकल्पविकल्प । थोर स्वामी समर्थाचे समीप । वृथा करूं नका हो

वाग्जल्प । गलिताहंकृति करा हो ॥ १४० ॥ या श्रीगुरु-दत्तावधूता । शरण व्हा हो त्वरित आतां । सर्वोत्तम महालाभ-काल तत्त्वतां । पुन्हा न येईल कदापि ॥ ४१ ॥ ऐशी अत्युच्चस्वरें गर्जना । चंचलभारती करी साधुजनां । खडबडूनि उठले मानोनि वचना । जागृत झाले संत ते ॥ ४२ ॥ श्रीनृसिंहमुनी विश्वरूप । भक्तवत्सल दाते सत्संकल्प । धरिती त्र्यमूर्ति सगुणस्वरूप । दिसती प्रत्यक्ष दत्तात्रेय ॥ ४३ ॥ दयाळु भक्तकार्यकल्पद्रुम । त्रिभुवनानंद अद्वैत परम । श्रीदसंरक्षणार्थ स्वरूप उत्तम । धरिती निगमागमवंद्य जे ॥ ४४ ॥ बालार्कप्रभ इंद्रनीलजटिल । विलसित भस्मांग रागोज्वल । शांत योगीश्वर चर्मांबरशार्दूल । भूषणें निर्मल शोभती ॥ ४५ ॥ ब्रह्माइंद्रसनकादिकीं परिवृत । सिद्ध महायोगी ऋषि समस्त । श्रीमद्दत्तात्रेयासि सदोदित । उपासिती अनन्य ते ॥ ४६ ॥ हृदयीं श्रीदत्तात्रेयध्यान । परमानंदें करिती चिंतन । श्रीदत्तमूर्ति चैतन्यघन । कमंडलुतीर्थीं उभी असे ॥ ४७ ॥ धन्य धन्य कमंडलु परमतीर्थ । साधुवृंद जमले दत्तदर्शनार्थ । सत्यत्वें भक्तप्रतिज्ञा-सिद्ध्यर्थ । त्रैलोक्यनाथ उभे ठेले ॥ ४८ ॥ श्रीमद्दत्तात्रेयावधूतदर्शन । धन्य पर्व सहज मद्भाग्योदयदिन । पूर्णब्रह्म गुरु सनातन । लाधले सहज समस्तांसी ॥ ४९ ॥ करिती प्रेमें साष्टांग दंडवत । षोडशोपचारें पूजिती संत । अत्यंतश्रद्धाभक्तिसमन्वित । नृसिंहदत्तात्रेयासी ॥ १५० ॥ प्रार्थना करिती भक्तजन । जयजय अवधूत निरंजन । भक्तमनीषा सफल करून । दिधलें दर्शन अपूर्व हें ॥ ५१ ॥ शके सत्राशें पंचाहत्तरांत । श्रीमद्गुरु दत्तावधूत-। दर्शनें सेवादास योगांतर्गत । रहस्य पावले निःशंक ॥ ५२ ॥ रहस्य हठयोगाचें वास्तव । सेवादासासी लाधलें सर्व । अंतरीं उदेला प्रेमभाव । नम्र झाले सेवादास ॥ ५३ ॥ विमानांतून पुष्पें वर्षती । सुरवर झाले प्रसन्न चित्तीं । पुढिले अध्यायीं श्रोतीं । तेचि कथा परिसावी ॥ ५४ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठवामनविरचित । द्वादशाध्याय गोड हा ॥ १५५ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे द्वादशोऽध्यायः समाप्तः ॥ १२ ॥ श्रीगुरुदेवदत्त ॥